दै. तरुण भारत दि. ०८/०९/२०२२

# पोलिस उपमहानिरीक्षक तांबोळी यांच्या विशेष पथकाची जुगार अड्डयावर धाड, २५ जण ताब्यात

तरुण भारत ०८/०९/२०२२



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ७ सप्टेंबर**

तालुक्यात हट्टा पोलिस ठाण्याचे हद्दीतील तुळजापूरवाडी येथे सुरू असलेल्या सर्वात मोठ्या जुगार अड्डयाची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. माहिती मिळाल्यानंतर नांदेड विभागाचे पोलीस उपम हानिरीक्षक निसार तांबोळी यांचे विशेष पथकाने मंगळवारी सायंकाळी तुळजापूरवाडी जुगार अड्ड्यावर छापा टाकून २५ जणांना जुगार खेळतांना ताब्यात घेतले तसेच २० लाख ३४ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की दिनांक ६ सप्टेंबर रोजी सायंकाळी पावणे सात वाजण्याच्या सुमारास मौजे तुळजापूरवाडी शिवारात दिलीप नागोराव चव्हाण राहणार तुळजापूरवाडी यांच्या शेतातील टिन शेडमध्ये बांधलेल्या गोठ्यामध्ये विविध जिल्ह्यातून आलेले २५ जुगारी हे या टिन शेडमध्ये अंदर बाहर नावाचा जुगार खेळत होते याबाबतची माहिती विशेष पोलीस उप महानिरीक्षक निसार तांबोळी नांदेड यांना मिळाल्यानंतर त्यांनी सदरील माहिती आधारे नांदेड जिल्ह्यातील कुंटूर पोलीस स्टेशन तालुका नायगाव चे पोलीस उपनिरीक्षक दिनेश येवले यांनी सदर ठिकाणी धाड टाकण्यासाठी पथक तयार करुन सदरील ठिकाणी धाड टाकण्याच्या सुचना दिल्याचे माहिती असुन पोलीस उपनिरीक्षक दिनेश येवले यानी सदरील तुळजापूरवाडी येथील सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर अंदरबहार खेळणाऱ्या २५ जणांना ताब्यात घेऊन त्यांच्या जवळील रोख रक्कम व एक स्कार्पिओ असा एकूण २० लाख ३४ हजार ४३० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. एवढा मोठा जुगार अड्डा सुरू असूनही याची माहिती स्थानिक पोलिसांना नव्हती का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

याप्रकरणी हट्टा पोलीस स्टेशन येथे विविध कलमान्वये २५ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास हट्टा पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक पठाण हे करत आहेत यामुळे वसमत तालुक्यात जुगार अड्डा बिनधास्तपणे सुरू असल्याचे चर्चा नागरिकांतून होत आहे यावर वेळीच लगाम लावावा अन्यथा अनेक संसार उध्वस्त होतील याकडे पोलीस प्रशासनाने लक्ष द्यावे अशी मागणी जनतेतून होत आहे.

दै. गावकरी दि ०८/०९/२०२२

# स. पोलीस अधीक्षक चांडक यांची जुगार अड्ड्यावर धाड

## २० लाख ३४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त ; पंचवीस जुगाऱ्यांवर गुन्हा

**नायगाव/प्रतिनिधी**

पोलीस स्टेशन हट्टा हद्दीत तुळजापूर वाडी शिवारात शेतातील आखाड्यावर जुगार खेळत असल्याची गुप्त माहिती मिळाल्यावरून पोलीस उपमहानिरीक्षक निसार तांबोळी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस अधिक्षक बिलोली अर्चित चांडक यांनी हिंगोली जिल्ह्यातील पोलीस स्टेशन हट्टा हद्दीतील तुळजापूर वाडी शिवारात शेतातील आखाड्यावर जुगार अड्ड्यावर धाड टाकली. यात २० लाख ३४ हजारांचा मुद्देमाल जप्त करुन २५ जणांवर गुन्हा दाखल केला. ही कारवाई ६ सप्टेंबर रोजी केली.

जुगार खेळत असल्याच्या गुप्त माहिती मिळाल्यावरून सहायक पोलीस अधीक्षक उप विभाग बिलोली अर्चित चांडक यांनी सदर ठिकाणी छापा टाकून रोख रक्कम ४ लाख ११ हजार ५१० व दहा दुचाकी, दोन चारचाकी वाहने तसेच २४ मोबाईल व पंचवीस आरोपीसह एकूण २० लाख ३४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सदर कारवाई रामतीर्थ ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिघे, कुंटूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक दिनेश येवले, पोलीस उपनिरीक्षक जोंधळे, पोलीस अमलदार भगवान कोतापल्ले, मारुती मुद्दमवार, चंद्रमणी सोनकांबळे, नायगाव पोलीस ठाण्याचे साईनाथ सांगवीकर, बाबू चरकुलवाड, पुणे बोईनवाड, सुनिता येडगे, रुद्रा कबाडे, अनिल सिद्धापुरे आदींचा सहभाग होता.